# ऑनलाइन फसवणूक; पोलिसांनी मिळवून दिली ३५ हजारांची रक्कम

लोकमत दि 08/07/2023

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड** : लग्न जुळविण्यासाठी ऑनलाइन ३५ हजार ५०० रुपये घेऊन फसवणूक करणाऱ्या आरोपींचा पोलिसांनी भंडाफोड केला असून तक्रारदाराला त्याचे संपूर्ण पैसे परत करण्यात आले आहेत. नांदेड येथील सायबर पोलिसांनी ही कामगिरी केली.

येथील एका युवकाने त्याच्या फेसबुक पेजवर वधू-वर परिचय करून देण्याची जाहिरात वाचली. या जाहिरातीमध्ये मोबाइल क्रमांक दिला होता. त्यावरून संपर्क केला. आम्ही ऑनलाइन पद्धतीने वधू-वर परिचय करून देतो, असे सांगून आरोपींनी युवकाला मुलींचे काही फोटोही पाठविले. त्या बदल्यात ऑनलाइन पद्धतीने ३५ हजार ५०० रुपये स्वतःच्या खातात जमा करून घेतले. मात्र पाठविलेल्या फोटोमधील मुलींच्या नातेवाइकांची भेट करून देण्यास आरोपींनी टाळाटाळ केली. आपली फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर या युवकाने वजीराबाद व सायबर ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली होती. सायबर ठाण्यातील अधिकाऱ्यांनी संपूर्ण माहिती घेतली. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबरचे उपनिरीक्षक गजानन दळवी, थोरवे आणि विलास राठोड यांनी ही कारवाई केली.

## बँक, वॉलेट एजन्सीकडे पाठपुरावा

- संबंधित बँक, वॉलेटचे नोडल अधिकारी यांच्यासोबत ई-मेलने संपर्क साधला. त्यावरुन संबंधित बँक, वॉलेट यांनी कारवाई केली. युवकाचे लाटलेले संपूर्ण ३५ हजार ५०० रुपये त्याच्या खात्यामध्ये परत जमा करण्यात आले.